# निशाणी क्र. २६ वरील आदेश

१. प्रतिवादी नं.१ यांनी सदरचा अर्ज "विना कैफियत" आदेश रद्द होणेकरीता दाखल केला आहे. याकामी प्रतिवादी विरुध्द दि.१५/१०/२०२० रोजी "विना कैफियत" चा हुकूम झाला असुन, प्रतिवादी नं.१ हे अशिक्षीत, अडाणी व वयस्कर असल्याने तसेच त्यांना उच्च रक्तदाब, मधुमेह वगैरे आजार असल्याने त्यांना आजापणामुळे वकीलपत्र देणे, तसेच आवश्यक ती कागदपत्रे व माहिती घेऊन वकीलांशी संपर्क साधता आला नाही व जरुर त्या कागदपत्रांची पुर्तता न करता आल्यामुळे प्रतिवादींना वादीच्या दाव्यास कैफियत मुदतीत देता आली नाही.

२. यातील प्रतिवादी हे जाणुनबुजून गैरहजर राहिलेले नव्हते अथवा त्यांनी जाणुनबुजून कैफियत देणेस उशीर केलेला नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश न्यायाचे दृष्टीने सेट असाईड होऊन मिळणे अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी नं.१ यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द न झालेस या प्रतिवादीच्या कायदेशीर न्याय व हक्कांवर गदा निर्माण होऊन या प्रतिवादीचे पैशाने कधीही न भरुन येणारे कायमचे नुकसान होणार आहे. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. प्रतिवादी नं.१ यांनी कैफियत दिल्यास सदरचे काम गुणदोषावर चालुनच न्यायदान करणेस मदतच होणार आहे. नैसर्गिक न्याय तत्वानुसार सदर प्रतिवादीस कायदेशीर संधी देणे आवश्यक आहे. तरी प्रतिवादी नं.१ यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादींचे विधीज्ञांनी हरकत घेऊन आपले म्हणणे दाखल केले. त्यांच्या मते प्रतिवादी यांचा अर्ज व त्यामधील संपुर्ण मजकुर धादांत खोटा व लबाडीचा असुन तो या वादीस मुळीच मान्य नाही कबुल नाही. अर्जासोबत कोणताही पुरावा नाही. अर्ज मुदतीत नाही. सबब अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली.

४.            वादी व प्रतिवादी नं.१च्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५.            अर्ज वाचला. अर्जामधील कथने प्रतिवादी नं.१ यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. उच्च रक्तदाब, मधुमेह वगैरे आजार असल्याने त्यांना आजापणामुळे वकीलपत्र देणे, तसेच आवश्यक ती कागदपत्रे व माहिती घेऊन वकीलांशी संपर्क साधता आला नाही व जरुर त्या कागदपत्रांची पुर्तता न करता आल्यामुळे प्रतिवादींना वादीच्या दाव्यास कैफियत मुदतीत देता आली नाही. प्रतिवादी नं.१ यांची कैफियत दाखल करुन घेतलेस वादातील मूळ प्रश्नाची निर्णिती करण्यास न्यायालयास मदत होणार असून त्यामुळे वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१.    प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२.    प्रतिवादी १ यांने नि.२५ वर झालेल्या आदेशानुसार कॉस्टची रक्कम ही वादीला द्यावी.

३.    कॉस्टची रक्कम वादी ला दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

ANANT RADHAKISHAN TENGSE    Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE Date: 2023.09.05 17:36:55 +0530

आटपाडी                (अनंत रा. टेंगसे )

दि. ०५/०९/२०२३        सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 05.09.2023
Order signed by the
Presiding Officer on - 05.09.2023
Order uploaded on - 05.09.2023